वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१९/नवि-१६ (ई-९३१९६४)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २९ एप्रिल, २०२५

संदर्भ :-

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१७ व दि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दि.१२ डिसेंबर, २०१७, दि. ३० सप्टेंबर, २०२० व दि. २४ एप्रिल, २०२३

प्रस्तावना :-

राज्यातील महानगरपालिका तसेच नगरपरिषद व नगरपंचायतींना अनुक्रमे महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्ट्यपूर्ण या योजनेअंतर्गत विविध विकास कामांसाठी निधी मंजूर केला जातो. सदर योजनांचे निकष संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा योजना, मलजल प्रक्रिया केंद्र, घनकचरा प्रकल्प, पथदिवे, प्रशासकिय इमारती इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीजेची आवश्यकता असते. सदर प्रकल्पांच्या वीज देयकाचा भार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर येतो. हा भार कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस नियोजन आराखड्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी त्यांना सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत धोरण निश्चित करण्याचे ठरले आहे. या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर करण्याचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्ट्यपूर्ण या योजनांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे या कामाचा समावेश करून सदर प्रकल्प प्राधान्याने मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पात्र राहतील.

२. वित्तीय आकृतीबंध-

प्रकल्प किंमतीपैकी राज्य शासनाचा व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा पुढील प्रमाणे राहिल-

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | राज्य शासनचा हिस्सा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | क व ड वर्ग महानगरपालिका | ७०% | ३०% |
| २ | अ वर्ग नगरपरिषद | ८५% | १५% |
| ३ | ब वर्ग नगरपरिषद | ९०% | १०% |
| ४ | क वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत | ९५% | ५% |

३. सौर ऊर्जा प्रकल्प शासन मान्यतेस सादर करताना सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बँकेत जमा असणे आवश्यक आहे.

४. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता आवश्यक असलेली जागा व इमारत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वमालकीची असावी तसेच सदर जागा ही नागरी क्षेत्राबाहेरील असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ मधील कलम ८९ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील कलम ९७ अन्वये संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) व सौर ऊर्जा प्रकल्पासाठी तांत्रिक मंजुरी (Technical sanction) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा-MEDA) कडून घ्यावी. त्यासाठीचे विहित शुल्क नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वनिधीतून महाऊर्जाला अदा करावे. महाराष्ट्र राज्याचे अपारंपरिक धोरण, २०२० नुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा-MEDA) कडे करणे अनिवार्य राहील.

६. सौर ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित सर्व नियम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (MERC) वेळोवेळी जारी केलेल्या किंवा सुधारित केल्या जाणाऱ्या नियमांनुसार असतील.

७. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी अनुदानाचे वितरण खालीलप्रमाणे तीन हप्त्यांमध्ये केले जाईल.

   i. पहिला हंप्ता:- सौर ऊर्जा प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश दिल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ३०% निधी वितरीत करण्यात येईल.

   ii. दुसरा हप्ता:- सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ५०% निधी वितरीत करण्यात येईल

iii. तिसरा हप्ताः- सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष वीज बचतीचे पहिले वीज देयक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत अनुदानाची २०% रक्कम वितरीत करण्यात येईल.

८. सदर प्रकल्पाची सुरक्षितता तसेच देखभाल दुरुस्ती करणेबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी.

९. सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता अनुदान महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान (ले.शि.४२१७ ०५४१ व ले.शि २२१७ ०९१३) व राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (ले.शि.४२१७ ०६०३ व ले.शि.२२१७ १३०१) या लेखाशिर्षातून उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०४२९१६३०३७२४२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2025.04.29 16:31:22 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्य मंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन ७ वा मजला, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१२) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई

१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१४) सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई - ४०० ६१४

१५) जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)

१६) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/ नगरपंचायती

१७) वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई

१८) कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९) निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.